# वसंत बापट ह्यांच्या कवितेतील आशयसूत्रे

**प्रा. समीर चंद्रकांत जाधव**
मराठी विभाग, साठये महविद्यालय मुंबई

---

**प्रस्तावना :**

कवी, ललित लेखक , गीतकार, प्रवासवर्णनकार, संपादक, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेले वसंत बापट हे स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाचे साहित्यिक होय. वसंत बापट यांच्या यांच्या कविता शाहिरी आणि आधुनिक कविता यांना जोडणारा एक दुवा आहे. वसंत बापट स्वत:च्या कवित्वाबद्दल म्हणतात "कवीला प्रतीत होणारी लयाची भिन्न रूपे म्हणजे छंद. लय म्हणजे मनाच्या अणुरेणूंतून भरलेली आणि कानांनी नव्हे तर गूढ श्रवणेंद्रियांनी अनुभवलेली वस्तू. छंद हा तिचा प्रकट उद्गार, छंदोमयी वाणीच्या वरदानाची जाणीव झाली त्या क्षणी मी कवी झालो."१

वसंत बापटांचा 'बिजली' हा १९५२ साली पहिला काव्यसंग्रह वाचकांसमोर आल्यानंतर १९९८ साली प्रसिद्ध झालेल्या 'धडपडणाऱ्या मुलाचे साने गुरुजी या पुस्तकापर्यंत पंचेचाळीस वर्षांत बापटांनी ३४ पुस्तके सिद्ध केली आहेत. त्यांत १३ कविता संग्रह ६ बालकविता संग्रह, १ बालनाट्य, २ बाल नृत्य-नाटक ३ प्रवासवर्णने, १ व्यक्तिदर्शन, ललितगद्य, राजकीय उपहास, २ समीक्षा, ३ संपादित सहसंपादित आणि २ संकीर्ण अशी वेगवेगळी पुस्तके आहेत. 'सेतु' (१९५७), 'अकरावी दिशा' (१९६२). 'मानसी' (१९७७), 'प्रवासाच्या कविता' (१९८२). 'तेजसी' (१९९१) हे स्फुट कवितांचे संग्रह, आणि 'चंगा मंगा' (१९८३), 'अबडक तबडक' (१९८३), 'गरगर गिरकी' (१९९२), आणि 'बालगोविंद' (१९६५, बालनाट्य), 'परीच्या राज्यात' (१९९४ बालनृत्य नाट्य), ही बापटांची उल्लेखनीय काव्यविषयक पुस्तके आहेत. याशिवाय 'बारा गावचं पाणी (१९६६), 'जिंकुनि मरणाला' (१९८१), 'ताणेबाणे (१९९९) ही प्रवासवर्णन-व्यक्तिदर्शन-ललितगद्य ह्या गटांत मोडणारी पुस्तके बापटांनी लिहिली आहेत. 'विसाजीपंतांची वीस कलमी बखर' हे राजकीय परिस्थितीवर उपहासपर भाष्य करणारे पुस्तक बखरीच्या शैलीत लिहिले आहे.

**कवितेचा प्रवास :**

वसंत बापट ह्यांनी महाविद्यालयीन काळात १९४२ च्या आंदोलनात भाग घेतला होता. कारावासात असताना सानेगुरुजी, एस. एम. जोशी इत्यादी समाजवादी नेत्यांशी त्यांचा परिचय झाला व ते सानेगुरुजीच्या राष्ट्रसेवादलात गेले सेवादलासाठी त्यांनी राष्ट्रभक्तिपर गीते, समूहगीते, पोवाडे, वग इत्यादी रचना केली. ह्या सर्व प्रेरनेतूनच 'बिजली' हा त्यांचा पहिला संग्रह १९५२ साली प्रकाशित झाला. ह्या संग्रहात राष्ट्रीय व राजकीय पार्श्वभूमी असणाऱ्या अनेक कविता आहेत. 'पहाटेचे स्वप्न', 'सदैव सैनिका पुढेच जायचे', 'चालू दे जयनाद', 'जल-उषा', 'झेलमचे अश्रु' इत्यादी कविता स्वातंत्र्याची आशा, देशाची फाळणी. महात्मा गांधींची हत्या इत्यादी समकालीन घटनांवर आधारित आहेत. महात्मा गांधींवरही त्यांच्या काही कविता आहेत. 'बिजली'च्या काळातील कवितेसंबंधी बापट यांनी 'सेतू' (१९५७) च्या प्रस्तावनेत लिहिले होते: "राजकीय व सामाजिक स्वातंत्र्याला मुकलेला, सर्व क्षेत्रांत वंचित राहिलेला हा देश त्या वेळी वेगाने ढवळून निघत होता.... नव्याने उदयाला येणाऱ्या

आपल्या राष्ट्राच्या आकांक्षा, पीडितांचे दुःख, जगण्याची इच्छा सगळे काही जवळून पाहत होतो. या सर्व घडामोडींचा परिणाम माझ्या व्यक्तिमत्त्वावर म्हणजे कवीवर होणे अपरिहार्य होते."२

**आशयसूत्रे :**

'सेतू' ह्या काव्यसंग्रहातील कवितांचे स्वरूप लक्षात घेतल्यास 'बिजली' मध्ये जी काव्य जाणीव प्रत्ययास येते ती 'सेतू' मध्ये पूर्णपणे बदलून गेली असे म्हणता येईल. 'सेतू' त राष्ट्रीय कविता आढळत नाही. त्यात प्रेमभावनेला प्राधान्य आहे. 'सेतू', 'स्मरते तुजला', 'अजून फुंकर', 'धुके', 'कसे सांगू तुला', 'गोरी', 'रंगाने तू गव्हाळ', 'वय वर्षे सोळा' इत्यादी कविता प्रेमभावनेची विविध रूपे व्यक्त करतात. बिजली मधून राष्ट्रभावना तर सेतूमधून निसर्गाचेही प्राबल्य, नाट्यात्मता हे बापटांच्या कवितेची महत्त्वाचे वैशिष्ट्ये प्रत्ययास येतात.

वसंत बापट यांच्या कवितेची वैशिष्ट्ये म्हणजे खटकेबाज, श्रुतिमधुर रचना आणि वृत्तबद्ध, छंदोबद्ध रचनेवरचे प्रभुत्व. संस्कृत काव्याचे संस्कार त्यांनी पचवले आणि शाहिरी कवितेतील नादानुकूल, अनुप्रासात्मक वळण मुरवून स्वतःची स्वतंत्र शैली घडवली. ती त्यांच्या लावण्यांमध्ये व लावणीसदृश रचनांमध्ये दिसते. 'अकरावी दिशा' (१९६२) मध्ये त्यांची कविता भावकवितेचे वळण अधिक दाखवते. 'लेणे', 'चंद्रकोरी परी कोवळे हासणे', 'अरे मी जाणते सारे', 'तू गर्भालस' या कविता त्या प्रकारच्या आहेत. पुढच्या काळात बापटांचा 'सकीना' (१९७२), 'मानसी' (१९७७), 'प्रवासाच्या कविता' (१९८२), 'शिंग फुंकले रणी' (१९८२) असे अनेक संग्रह प्रकाशित झाले. त्यांच्या प्रवासाच्या कविता हा अमेरिकेतील प्रवासाचे अनुभव, तिथल्या नागरिकांसंबंधीची निरीक्षणे, तेथील संस्कृती, वातावरण यासंबंधीच्या प्रतिक्रिया कवितांमधून शब्दांकित करणारा संग्रह बराच लोकप्रिय झाला. 'तेजसी' (१९९१) या संग्रहात थोर तेजस्वी व्यक्तींसंबंधीच्या भावना प्रकट करणाऱ्या कविता आहेत, तर 'मेघहृदय' (१९८८) हे कालिदासाच्या मेघदूताचे स्वैर रूपांतर आहे. वसंत बापट यांनी विंदा करंदीकर आणि मंगेश पाडगावकर यांच्यासह सर्वत्र काव्यवाचनाचे कार्यक्रम केले. परंतु प्रारंभीचा काळ वगळता प्रखर सामाजिक जाणिवेपासून, समकालीन काळातील अस्वस्थ आंदोलनांपासून, वैचारिकतेपासून त्यांची कविता दूरच राहिली.

वसंत बापट कवी म्हणून रसिकप्रिय असले, तरी त्यांची गद्यलेखनातील कामगिरी ही लक्षणीय ठरली आहे. साने गुरुजींच्या इच्छेनुसार त्यांनी 'साधना' साप्ताहिकाच्या प्रारंभकाळात साने गुरुजींना सहकार्य केले. १९८३ पासून १९९८ पर्यंत 'साधना' साप्ताहिकाच्या प्रमुख संपादकपदाची जबाबदारी बापटांनी निष्ठापूर्वक सांभाळली होती. त्यासाठी अग्रलेख, टीकालेख आहे. प्रासंगिक लेख या स्वरूपाचे लेखन केले. खट्याळ विनोदबुद्धी, धारदार उपहास, बखरीची शैली आणि नाट्यमयता अशा गुणांनी ढंगदार बनलेल्या स्फुटांतून बापटांचे 'विसाजी पंतांची वीस कलमी बखर' (१९८७) हे पुस्तक सिद्ध झाले. 'जिंकुनि मरणाला' (१९८१) या व्यक्तिचित्रणपर पुस्तकात बापटांनी त्यांना भावलेल्या व्यक्तीविषयी समरसतेने लिहिले आहे. त्यांत बालगंधर्व, आचार्य अत्रे, साने गुरुजी, बॅ. नाथ पै, आवाबेन देशपांडे, नाना नारळकर अशी भिन्नधर्मी व्यक्तिमत्त्वे आहेत. 'ताणे बाणे' (१९८७) हा बापटांच्या आत्मपर स्तंभलेखनातून तयार झालेला लेखसंग्रह आहे. तर बारा गावचं पाणी' (१९६६) हे प्रवासवर्णन आहे.

**सारांश :**

वसंत बापट आरंभी समाजवादी विचारसरणीचे आणि समाजाभिमुख वृत्तीचे कवी असलेले दिसतात.

त्यांनी जुनी शाहिरी, ढंगाची शब्दकळा आणि नवी समाजवादी जाणीव याचा मेळ आपल्या कवितेत साधलेला दिसतो. कवी कुसुमाग्रजांशी त्यांचे अंशतः प्राकृतिक नाते होते. नाट्यमय मांडणीच्या अंगानेही हे नाते दाखवता येईल. करंदीकरांप्रमाणेच त्यांच्याही कवितेतला समूहभाव पुढे ओसरत गेला. त्यांचा स्वतःचाच असा नाटकी भाव कमी झाला आणि 'मानसी'च्या रूपानं संयत, उत्कट मालिकाकविता निर्माण झाली. सूक्ष्म संवेदना, सखोल चिंतन किंवा नव्या जाणिवा हे बापटांचे विशेष कधीच नव्हते. पण मोहक, अस्सल मराठमोळी शब्दकळा आणि नाट्यपूर्ण रचनाबंध या दृष्टीने त्यांची कविता लक्षणीय ठरली, लोकप्रिय ठरली हे तर उघडच आहे.

**निष्कर्ष :**

१. वसंत बापट यांची कविता समकालीन घटनांना कवेत घेणारी आहे.

२. 'बिजली' ह्या काव्यसंग्रहात राष्ट्रीय व राजकीय पार्श्वभूमी कवितागत मी मांडताना दिसतात.

३. . 'सेतू' या काव्यसंग्रहात प्रेमभावनेला प्राधान्य दिलेले आहे. 'सेतू', 'स्मरते तुजला', 'अजून फुंकर', 'धुके', 'कसे सांगू तुला', 'गोरी', 'रंगाने तू गव्हाळ', 'वय वर्षे सोळा' इत्यादी कविता प्रेमभावनेची विविध रूपे व्यक्त करताना दिसतात.

४. ‘प्रवासाच्या कविता’ या काव्यसंग्रहात अमेरिकेतील प्रवासाचे अनुभव, अमेरिकेतील संस्कृती, तेथील वातावरण यांसंबंधीच्या प्रतिक्रिया शब्दांकित होताना दिसतात.

५. 'तेजसी' या काव्यसंग्रहात कवितागत मी तेजस्वी व्यक्तींसंबंधीच्या भावना प्रकट करताना दिसतात.

६. वसंत बापट यांच्या कवितेत अस्सल मराठमोळी शब्दकळा आणि नाट्यपूर्ण रचनाबंध विशेषत्वाने जाणवतो.

७. वसंत बापट यांच्या कवितेची भाषा शैली खटकेबाज, श्रुतिमधुर रचना आणि वृत्तबद्ध, छंदोबद्ध रचनेवरचे प्रभुत्व. संस्कृत काव्याचे संस्कार आणि शाहिरी कवितेतील नादानुकूल, अनुप्रासात्मक वळण मुरवून स्वतःची स्वतंत्र शैली घडवलेली दिसते.

**संदर्भ :**


- बापट वसंत, गुप्ते चारूशीला, आजची मराठी कविता (संपादक), जय प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. ०५
- पाडगावकर मंगेश, सेतू, (प्रस्तावना) पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई , चौथी आवृत्ती, १९९०, पृ. सहा, सात


Research Hub International Journal